(१५)

विषय:- "क्लब" आणि "हॉटेल" व्यतिरिक्त सार्वजनिक ठिकाणी तात्पुरती क्लब अनुज्ञप्ती देण्याबाबत.

## परिपत्रक

क्र. एफएलआर ११९८/२५५०७/सात, मुंबई, २१ फेब्रुवारी १९९८

मुंबई विदेशी मद्य नियमावली १९५३ चे नियम-४८ [ब] खाली तात्पुरती "क्लब" अनुज्ञप्ती देण्याची तरतूद आहे. जरी प्रचलित नियमाप्रमाणे या अनुज्ञप्तीसाठीची फी दर दिवशी रु.३०००/- या प्रमाणे असली तरी या कार्यालयाचे दिनांक १२.१.९८ च्या अधिसूचित आदेशानुसार ही फी दिनांक १.४.९८ पासून रु. ३५००/- प्रतिदिनी अशी वाढविण्यात आलेली आहे.

कोणत्याही हॉटेलमध्ये किंवा क्लबमध्ये मूळ एफएल-३ अथवा एफएल-४ अनुज्ञप्ती खाली मंजूर जागे व्यतिरिक्त जर मद्य सेवा देण्यासाठी एखादा कार्यक्रम आयोजित केला असेल तर त्या ठिकाणी "तात्पुरती क्लब" अनुज्ञप्ती घेणे आवश्यक आहे. या शिवाय अन्य "सार्वजनिक ठिकाणी" अशी मद्य सेवा देण्याचा कार्यक्रम आयोजित केल्यास देखील तात्पुरती क्लब अनुज्ञप्ती घेणे जरूरीचे आहे. परंतु शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, अजूनही ब-याचशा "हॉटेल्स" किंवा "क्लब" मधून मंजूर अनुज्ञप्तीच्या जागे व्यतिरिक्त मद्य सेवा कार्यक्रम आयोजित होत असले तरी त्याकरिता "तात्पुरती क्लब" अनुज्ञप्ती घेण्यात येत नाही. संबंधीत राज्य उत्पादन शुल्क अधिका-यांनी दुर्लक्ष केल्या शिवाय असे घडणे सहसा शक्य होणार नाही. तरी सर्व अधीक्षकांना कळविण्यात येते की, ही बाब शासकीय महसूलाशी देखील निगडीत असल्यामुळे त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील निरीक्षकांना या संदर्भात अधिक जागरूक रहाण्याबाबत सूचना निर्गमित कराव्यात. यापुढे कोणत्याही कार्यकारी निरीक्षकांच्या कार्यक्षेत्रात विना अनुज्ञप्ती असे कार्यक्रम होतांना आढळल्यास संबंधीत निरीक्षकांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी. मात्र या नियमांची अंमलबजावणी करताना कोणत्याही कार्यक्रमात प्रत्यक्ष व्यत्यय न आणता मूळ "क्लब" किंवा "हॉटेल अनुज्ञप्ती" धारका विरुध्द कार्यवाही करण्यात यावी जेणे करून जनमानसाचा रोष होणार नाही.

सदर परिपत्रकाची पोच द्यावी.

[ प्र. व. मिश्रा. ]
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबईकरिता.

प्रत- आयुक्तांच्या मान्यतेने

प्रति,

१] सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
२] सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
३] सर्व कार्यासन अधिकारी,
४] अभिलेख शाखा,

गआफो/२१९९८